# राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प
# जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद.

**राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प कार्यालय औरंगाबाद.**

केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प औरंगाबाद जिल्हयात राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रकल्प कार्यालय व विशेष प्रशिक्षण केंद्रावर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामिण भागात, तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावरील कामासाठी बाहयस्थ मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर कार्यक्रम व्यवस्थापक, व्यवसाय प्रशिक्षक , शिक्षक , लिपीक ११ महिन्यासाठी पुर्ण वेळ नेमावयाचे आहे. त्यासाठी खालील नमुद पदानुसार शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करित असलेल्या उमेदवारा कडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

उमेदवारांनी जाहिरात बघण्यासाठी व विहित नमुन्यात अर्ज करण्यासाठी www.aurangabad.gov.in या संकेत स्थळावरील **News And Update** या मधील **National Child Labour Project Aurangabad Contractual Recruitment 2019** या लिंक वर सुविधा उपलब्ध आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | भरावयाची पदे/प्रतिक्षाधिन यादिसाठीची एकुण पदे | **शैक्षणिक पात्रता** | वयोमर्यादा | अनुभव | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कार्यक्रम व्यवस्थापक ( कंत्राटी )** | २ | १.बी.एस.डब्ल्यु. किंवा एम.एस.डब्ल्यु उत्तीर्ण आवश्यक . | वयोमर्यादा २१ ते ४५ वर्ष. | शासकीय प्रकल्प अथवा राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पात काम केल्याचा अनुभव असल्यास अतिरिक्त १० गुण देण्यात येतील (किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक ) | १८०००/- |
| २ | **व्यवसाय प्रशिक्षक ( कंत्राटी )** | २७ | १आय.टी.आय. (शासकीय आय.टी.आय.चे शासन प्रमाणपत्र आवश्यक ) | वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष. | शासकीय प्रकल्प अथवा राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पात काम केल्याचा अनुभव असल्यास अतिरिक्त १० गुण देण्यात येतील (किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक ) | ९०००/- एकत्रीत मासिक मानधन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | **शिक्षक (volunteer Teacher) ( कंत्राटी )** | १३० | कोणत्याही शाखेचा पदवीधर | वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष. | शासकीय प्रकल्प अथवा राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पात काम केल्याचा अनुभव असल्यास अतिरिक्त १० गुण देण्यात येतील (किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक ) | ७०००/- एकत्रीत मासिक मानधन |
| ४. | **लिपीक ( कंत्राटी )** | ६५ | १.एच.एस.सी.<br>२.मराठी, इंग्रजी टंकलेखन आवश्यक. | वयोमर्यादा २१ ते ४५ वर्ष. | शासकीय प्रकल्प अथवा राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पात काम केल्याचा अनुभव असल्यास अतिरिक्त १० गुण देण्यात येतील (किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक ) | ५०००/- एकत्रीत मासिक मानधान |

**सदरील पदांसाठी आवश्यक अटी व शर्ती खालीलप्रमाणे –**

**१. उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दिनांक ३१/०३/२०२० पर्यत राहिल.**

**२. जाहिरातीतील पदे राज्य शासन अथवा केंद्र शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम स्वरुपाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासना मार्फत सेवा संरक्षण किंवा त्या संबंधी दावा करण्याचा अधिकारी राहणार नाही. सदरची कंत्राटी पदे ही जाहिरातीतील नमुद महानगरपालिका अंतर्गत व ग्रामिण भागातील कार्यक्षेत्रात असतील.**

**३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानिसक दृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.**

**४. उपरोक्त कंत्राटी पदाकरिता मानधन दर महा केंद्र शासनाने ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक सुचीनुसार देण्यात येईल.**

**५. जाहिरातीतील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो. तसेच रिक्त ठिकाणांमध्ये बदल होऊ शकतो, या बाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प यांनी राखुन ठेवले आहेत.**

**६. उपरोक्त पदांसाठी निश्चित केलेली शैक्षणिक अर्हता अर्जदारांनी केलेल्या अर्जामध्ये नसल्यास तसेच अर्ज अपुर्ण असल्यास तसेच अर्जामध्ये नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास सदरचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. निवड यादीतील गुणांनुक्रमांकाच्या आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल,या बाबत उमेदवारांना कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.**

**८. उपरोक्त पदांसाठी निश्चित केलेली पद क्रमांक ०१ व ०४ साठी किमान २१ व कमाल ४५ तसेच पद क्रमांक २ व ३ साठी किमान २१ ते कमाल ५० वयोमर्यादा जाहिरातीच्या दिवशी असणे आवश्यक राहिल.**

९. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोयीनुसार ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१०.भरती प्रक्रिया स्थगीत करणे / रद्द करणे /पदभरती प्रक्रिया भरतीमध्ये बदल करणे इत्यादी सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प औरंगाबाद यांचेकडे राखीव ठेवण्यात आले आहे. या बाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतीम राहील.

११. उमेदवाराला परिक्षेसाठी उपस्थित राहणे बाबतचा प्रवास भत्ता किंवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१२.सदरची भरती प्रक्रिया पुर्ण झाल्या नंतर ११ महिन्याच्या कालावधीत भविष्यात जर एखाद्या ठिकाणी नियुक्त कंत्राटी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने जागा रिक्त झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

१३.विहित अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ३०/०८/२०१९ ते ०५/०९/२०१९ या कालावधीत करावे. ( ऑनलाईन अर्ज फक्त स्विकारले जातील.)

१४.सदरील पदांच्या परीक्षा दिनांक ०८/०९/२०१९ रोजी घेण्यात येतील.

१५.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि. १३ मार्च २००३ नुसार उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे / वापराबाबचे तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचे अधिकृत,MS-CIT किंवा D.O.E.A.C.C. या सोसायटीचे C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर B किंवा C स्तर यापैकी एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संगणक अर्हता प्रमाणपत्र म्हणुन सादर करणे आवश्यक राहील.

१६.निवड प्रक्रिया सुरु झाल्यांनंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारने चुकीची माहिती प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास संबधिताची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१७.उपरोक्त पदांसाठी ८० गुणांची लेखी परिक्षा व शैक्षणीक अर्हता व अनुभव यासाठी २० गुण असे एकुण १०० गुणांची परीक्षा असेल.

१८.८० गुणांच्या परिक्षेकरीता सामान्यज्ञान-२० गुण , मराठी -२० गुण, इंग्रजी - २० गुण, गणित व बुध्दीमत्ता चाचणी -२० गुण असे एकुण ८० गुणांची वर्गवारी राहिल.

१९.शैक्षणिक अर्हता व अनुभव यासाठी २० गुण राहतील.

१.कार्यक्रम व्यवस्थापक

शैक्षणिक अर्हता - एम.एस.डब्ल्यु – ५ गुण, एम. फील अथवा पी. एच.डी.- ५ गुण

अनुभव – १० गुण राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाचा अनुभव असल्यास मिळतील (अनुभव किमान १ वर्ष आवश्यक)

२.व्यवसाय प्रशिक्षक

शैक्षणिक अर्हता- डि.टी.एड. अथवा बी.एड अथवा पदवीधर – ५ गुण

पदव्युत्तर पदवी – ५ गुण

अनुभव – १० गुण राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाचा अनुभव असल्यास मिळतील (अनुभव किमान १ वर्ष आवश्यक.)

३.स्वयंसेवक शिक्षक

शैक्षणिक अर्हता- डि.एड. अथवा सी.टी.सी . अथवा ए.टी.डी. -५

गुण बी.एड अथवा बी.पी.एड – ५ गुण ,पदव्युत्तर पदवी – ५ गुण

अनुभव – १० गुण राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाचा अनुभव असल्यास मिळतील

(अनुभव किमान १ वर्ष आवश्यक.)

४.लिपीक

शैक्षणिक अर्हता - पदवीधर – ५ गुण , पदव्युतर पदवी -५ गुण

अनुभव – १० गुण राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाचा अनुभव असल्यास मिळतील

(अनुभव किमान १ वर्ष आवश्यक.)

२०.परिक्षार्थीस परिक्षेसाठी ओळखपत्र म्हणुन ऑनलाईन प्रवेश पत्र सोबत आणणे बंधनकारक राहिल.

२१.उमेदवारांना अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक राहिल.

२२.जाहिरातीतील नमुद पदांच्या परिक्षा औरंगाबाद शहरातच घेण्यात येतील. या व्यतिरिक्त इतरत्र कुठेही परिक्षा केंद्र असणार नाही.

२३.सदरची नियुक्ती या केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाच्या मान्यतेच्या आधिन राहुन देण्यात येणार असुन या पदांना केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाची मान्यता आल्यानंतरच उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात येईल.

२४.लेखी परिक्षेचे स्वरुप उपरोक्त जाहीरातीतील नमुद पद क्र. १ साठी वेगळा पेपर व पदक्रमांक २,३,४, साठी वेगळा एक पेपर राहतील. व ज्यांना दोन पदांसाठी अर्ज करावयाचा आहे त्यांना स्वतंत्र अर्ज करावे लागतील.

२५.लेखी परिक्षा व शैक्षणिक अर्हता, अनुभव या सर्वाचे एकत्रित गुणांची गुणवत्ता यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल.

२६.निवड झालेल्या उमेदवारास रु. १०० च्या बॉंड (हमी पत्र) वर सेवेबाबतचा ११ महिन्यांचा करार नामा करुन देणे बंधणकारक राहिल.

२७.नियुक्त उमेदवारास पुर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. तसेच प्रकल्पा व्यतिरिक्त इतर कुठेही काम करता येणार नाही तसेच काम करत असतांना कुठल्याही प्रकारच्या अनपेक्षित घटना अथवा नैसर्गिक आपत्ती अथवा अपघात अथवा इतर कोणत्याही कारणास्तव शारिरिक इजा झाल्यास उमेदवार स्वःता जबाबदार राहिल त्या बाबत कोणतीही नुकसान भरपाई / वैद्यकिय खर्च दिला जाणार नाही. किंवा हे कार्यालय यास जबाबदार राहणार नाही.

२८.नियुक्त उमेदवारास स्वःता च्या इच्छेनुसार सेवा मुक्त व्हायचे असल्यास एक महिन्याची प्रकल्पास आगाऊ नोटीस देणे बंधणकारक आहे. अशी नोटीस न दिल्यास व सेवा सोडुन गेल्यास एक महिन्याचे मानधन त्याच्याकडुन वसुल करण्यात येईल. तसेच कर्तव्यात कसुर करणे, असभ्य बेजबाबदार वर्तन केल्यास कोणतेही कारण न दर्शविता उमेदवाराच्या सेवा समाप्त करण्याचा संपुर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना राहिल.

मा.जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने

*स्वाक्षरीत/-*

सहा. कामगार आयुक्त<br>
तथा सदस्य सचिव<br>
औरंगाबाद जिल्हा बालकामगार<br>
पुनर्वसन प्रकल्प संस्था,औरंगाबाद